रे.क.नं.६३/२०२६

**मे.सिव्हील जज्जसो, ज्युनिअर डिव्हीजन, वडगाव**
**यांचे कोर्टात.**

१. राहुल अजीत वडर, } वादी
वगैरे

ORDER
Issue notice to defendants

Sd/-
Jt. C.J.J.D., Peth-Vadgaon

विरूद्ध

१. श्री.अजीत शामराव वडर, } प्रतिवादी
वगैरे

यातील वादी तर्फे विनंती अर्ज की,

१. यातील वादी यांनी **मौजे तळसंदे**, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, मे.दुय्यम निबंधकसो हातकणंगले, यांचे कार्यक्षेत्रामधील ग्रामपंचायत तळसंदे यांचे हद्दीतील ग्रामपंचायत मिळकत नं.२०६०, क्षेत्र १०५६ चौ.फुट ही घर मिळकत व पडसर जागा. या मिळकतीबाबत कायम मनाईचा दावा दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत दावा मिळकत ही यातील वादी यांची वडीलार्जीत स्वरूपाची असून सदर मिळकत ही मौजे तळसंदे येथील गायरान विभागातील आहे. यातील वादीचे

10/3/26
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon

आजोबा शामराव भिमाण्णा वडर यांचे खुद्द मालकी वहिवाटीची दावा मिळकत होती. त्याच ग्रामपंचायत मिळकत चालता नं.९१४ असा नमुद होता व तशी नोंद ग्रामपंचायत दप्तरी सन २०१५-१६ ते २०१८-१९ पर्यत होती. त्यानंतर सदर मिळकतीचे विभाजन होऊन ग्रामपंचायत चालता नं.२०६० असा देणेत आला.

३. असे असताना यातील प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी संगणमत करून दावा मिळकतीबाबत तारणगहाण दस्त केलेचे नुकतेच समजुन आले आहे. परंतु सदर दस्त नोंदणी करत असता दावा मिळकतीचे वर्णन मध्ये मौजे तळसंदे येथील ग्रामपंचायत मिळकत नं.२०६०/२ असा नमुद केलेचे निदर्शनास आले आहे. यावरून प्रतिवादी नं.१ ते ३ हे वादींची फसवणुक करणेच्या प्रयत्नात आहेत असे स्पष्ट होते.

४. यातील वादी अगर त्यांचे पूर्वहक्कदार यांना ग्रामपंचायत मिळकत नं.२०६० या मिळकतीबाबत आजअखेर कोणतीही नोटीस नाही किंवा वादी यांनी प्रतिवादी नं.३ यांचेकडून कोणत्याही कर्जाची उचल केलेली नाही.

५. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी नं.३ हे अनाधिकाराने दावा मिळकत जप्त करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे झाले तर वादी यांना कोणतेही रहावयास घर राहणार नाही व त्यांना उघडयावर रहावे लागणार आहे. त्यामुळे सदर दाव्याच्या कामी दावा मिळकतीबाबत जैसे थे परिस्थिती ठेवणेचा आदेश होणे न्यायाचे होणार आहे.

६. यातील वादीचे वय पहाता त्यांचेकरीता भविष्यामध्ये कोणतीही घराची तरतुद नाही. त्यामुळे सदरची घर मिळकत जप्त झालेस वादीचे अत्यंत नुकसान होणार आहे. यातील प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी वादीची फसवणुक केलेचे सकृतदर्शनी तारणगहाण दस्तावरून सिद्ध होते. त्यामुळे यातील प्रतिवादी नं.१ ते ३ यांचा

20/3/20
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

उद्देश दावा मिळकत बेकायदेशीररित्या त्रयस्त इसमास विकणेचा आहे असे स्पष्ट होते.

७. यातील प्रतिवादी यांना सदर दावेची नोटीस लागु होऊन सदर प्रतिवादी हे या दाव्याचे कामी कैफियत/म्हणणे देणेस बराच कालावधी जाणार आहे. तसेच सदरचा दावा गुणदोषावर चालुन याकामी न्यायनिर्णय होण्यास बराच कालावधी जाणार आहे. त्याकारणाने दावा मिळकतीबाबत जैसे थे परिस्थिती ठेवणेचा निर्णय होणे न्यायाचे होणार आहे.

<u>८. सबब वादींची विनंती की,</u>

अ. वादींचा अर्ज मंजुर करणेत यावा.

ब. वर नमुद मौजे तळसंदे येथील ग्रामपंचायत मिळकत नं.२०६० बावत यातील प्रतिवादी नं.१ ते ३ यांनी संगणमताने कोणतीही कार्यवाही करू नये अगर दावा मिळकत विक्री करू नये याकरीता जैसे थे परिस्थिती ठेवणेबाबत आदेश व्हावा.

क. जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे असे.

मे.जा.व्हावे

वडगाव

ता.२०.०३.२०२६

वादी नं.१ Rohit.

Y... 20/3/26
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

## ॲफिडेव्हीट

मी यातील वादी नं.१ राहुल अजीत वडर, व.व.२१, धंदा - व्यवसाय, रा.तळसंदे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, स्वत: करीता व वादी नं.२ करीता सत्य प्रतिज्ञेवर ॲफिडेव्हीट करतो की, वर नमुद अर्जातील संपूर्ण मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुा वडगाव. ता.२०.०३.२०२६

मे.जा.व्हावे

Rahul.

मी ॲफिडेव्हीट करणार
यांना ओळखतो.

ॲडव्होकेट

## प्रतिज्ञा

मी यातील वादी नं.१ राहुल अजीत वडर, व.व.२१, धंदा - व्यवसाय, रा.तळसंदे, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर, सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की वरील अर्जातील व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहीती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा वडगाव.

मे.जा.व्हावे

Rahul.

वडगाव
ता.२०.०३.२०२६

Solemnly Affirmed before me by
Shri Rahul Ajit Vadar
Age 21 of Talsande Tal who is Hatkanangale
identified by Sh A.D. Tandale Adv.
.............whom I know personally
Dated :- 20/3/26

Assistant Superintendent